क्र.मासंवि/रवका/न.क्र.३४८/ ३६०२४
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
**मुंबई - ४०० ०१९.**
email : managerpom@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

दिनांक : **२९/१२/२०१२**

# परिपत्रक

विषय : कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ आढावा बैठक.

संदर्भ : कार्यासन अधिकारी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र.आयएलई-२०१२/ प्र.क्र.३१७/प्रशासन-३, दि.१० सप्टेंबर २०१२.

.....

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंधक उपाययोजना व तक्रारींच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत प्रशासकीय परिपत्रक क्र.३०५, दिनांक ०४.०८.२०१० व परिपत्रक क्र. साप्रवि/रवका/ ८३२/११८८१, दि.२१.०४.२०११ अन्वये सूचना जारी करण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात विशाखा जजमेंटनुसार कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करावयाच्या कार्यपध्दतीबाबत आयोजित केलेल्या प्रधान सचिव, महिला व बालविकास यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीच्या ईतिवृत्ताची संदर्भिय पत्रासोबत प्राप्त झालेली प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

२. सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की, या विषयाबाबत पारित करण्यात आलेल्या सूचनांचे तसेच अवर सचिव,महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.मबाआ-२०१२/प्र.क्र.२०/मकक, दि.०९.०८.२०१२ सोबत प्राप्त झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताचे अवलोकन करावे. त्याचप्रमाणे या संदर्भात सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी व त्याबाबतीत केलेली कार्यवाही शासनाकडे वेळोवेळी पाठविण्यात यावी.

३. सदर परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

**( संदेश ए. हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Circular-F.N.348.doc*

का.सं. / मा.सं 1244  MD/D/O&M/2120 13/9/12

दिनांक 14/09/12

तात्काळ/कालमर्यादा

फॅक्स क्र:२२०२५८८१, २२८२४४४६
दूरध्वनी क्र:२२८१०३९४
ई मेल:ielddo_adm३@maharashtra.gov.in

क्र.:आयएलई-२०१२/प्र.क्र.३१७/प्रशासन-३
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :१० सप्टेंबर, २०१२.

महावितरण मुंबई
सा प्रवि ८ र.व.का.
आवक/~~जावक~~
नंबर: G-27
दिनांक: 18/9/12

प्रति,

१. सचिव, (लघु व मध्यम उद्योग) तथा पदसिद्ध विकास आयुक्त (उद्योग),उद्योग संचालनालय,मुंबई.

२. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री, मुंबई

३. संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई

५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई

६. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड (एमपीसीएल), मुंबई

७. मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

८. व्यवस्थापकीय संचालक,कोकण विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

९. व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे

१०. व्यवस्थापकीय संचालक, मराठवाडा महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद

११. व्यवस्थापकीय संचालक, विदर्भ महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, नागपूर

१२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर

१३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, मुंबई

१४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिकी महामंडळ मर्यादित, मुंबई

१५. मुख्य अभियंता (विद्युत), प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, मुंबई

१६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत धारक कं. लि. मुंबई

१७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मीती कं. लि., मुंबई

१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. लि., मुंबई

१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि., मुंबई

२०. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे

२१. सचिव , महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग, मुंबई

२२. कामगार आयुक्त, मुंबई.

C.G.M. (HR) For necessary action.

ED (HR) pl 12.09

CGM (HR-T/E)
GM (HR-MPP)
GM (HR-NTB)
GM (HR)

MGR (DC)
MGR (O&M)

२३. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई
२४. संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई
२५. प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, वांद्रे (पूर्व),मुंबई
२६. संचालक, कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई
२७. कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ , मुंबई.

**विषय** : कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ आढावा बैठक

**संदर्भ :** महिला व बालविकास विभागाचे क्र.मआबा-२०१२/प्र.क्र.२०/मकक चे दिनांक ९/८/२०१२ रोजीचे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन पत्राची प्रत व बैठकीच्या इतिवृत्तांताची प्रत माहितीसाठी व योग्य त्या तात्काळ कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे. सदर इतिवृत्तांतातील मुद्दा क्र. १ ते ५ कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. त्यानुसार विहित केलेल्या कालावधीत सदर माहिती पुर्ण करावी.

आपल्या कार्यालयात महिला तक्रार निवारण समितीचे गठण करण्याबाबत आपण या विभागाच्या समक्रमांकाच्या दिनांक ७ ऑगस्ट, २०१२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. यानुसार महिला तक्रार निवारण समिती स्थापन करुन, त्याची सूचना कार्यालयात दर्शनिय ठिकाणी लावावी. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाबाबतच्या आपल्या कार्यालयात प्राप्त तक्रारींची संख्या, कार्यवाही पूर्ण झालेली प्रकरणे, चौकशी कार्यवाही सुरु असल्यास चौकशीची सद्य:स्थिती याबाबतची माहिती व महिला तक्रार निवारण समिती स्थापन केल्याबाबतचे प्रमाणपत्र दिनांक १०/९/२०१२ पुर्वी या विभागाकडे पाठवावे, ही विनंती.

आपली

( **श्र.वि.मोकल**)
कार्यासन अधिकारी,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.

**प्रत आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी :-**

अवर सचिव (उद्योग-३, कामगार-८, उद्योग-९, ऊर्जा-२)

कार्यासन अधिकारी (कामगार १ कामगार-६ उद्योग-४ उद्योग-६ उद्योग-७ उद्योग-१० उद्योग-१४)

# महाराष्ट्र शासन

Govt. of Maharashtra

क्र.मबाआ-२०१२ /प्र.क्र.२०/मकक
महिला व बाल विकास विभाग,
३ रा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक :- ९.८.२०१२

महोदय/ महोदया,

विशाखा जजमेंटनुसार कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी करावयाच्या कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी अध्यक्षा, राज्य महिला तक्रार निवारण समिती यांच्या अध्यक्षतेखाली दि:९.८.२०१२ रोजी सकाळी ११.३० वाजता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सभागृह, दुसरा मजला येथे बैठक आयोजित केलेल्या व प्रधान सचिव, महिला व बाल विकास यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीच्या इतिवृत्तांताची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

(शो.शि.मत्रे)
अवर सचिव

**सोबत : वरीलप्रमाणे.**

प्रति,

~~सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव~~/ सचिव,
---------------- कामगार विभाग

**विशाखा जजमेंटनुसार कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत प्रधान सचिव, महिला व बाल विकास यांच्या अध्यक्षतेखाली दि.९.८.२०१२ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सभागृह, दुसरा मजला येथे आयोजित केलेली व प्रधान सचिव, महिला व बाल विकास यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

वरील बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्रीम.शैला पाटील, सह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) श्रीम.क.कि.पारकर, सह सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई.
३) श्रीम.सीमा य.उकार्डे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) श्री.राजेंद्र मारुती बेंगली, सह सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) श्रीम.मु.ध.अंबादे, सह सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) श्री.जी.डी.जगधने, सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क.
७) श्री.व्ही.जी.रावळ, सहायक संचालक, उपवने, उद्याने (सा.बां.)मुंबई
८) श्री.र.वि. श्रीगिरीवार, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव
९) श्री. सु.ता.मगरे, उप सचिव, वैद्यकिय शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.
१०) श्री.मो.का.भोय, उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) श्री.अ.शां.अहिरे, उपसंचालक (प्र) मेटा, नाशिक
१२) श्री.वि.रा.कुमावत, व्यवस्थापक (आस्था), उद्योग संचालनालय
१३) श्रीम.अनुराधा पाटील, अवर सचिव, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई.
१४) श्री.कि.मा.देशपांड, अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) श्री.ता.का.शेंडे, विशेष अधिक्षक, मुख्य अभियंता जलविद्युत प्रकल्प, मुंबई.
१६) श्री.आर.बी.च-हाटे, विशेष अधिक्षक मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती.
१७) श्री.वि.द.शिंदे, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) श्रीम.मा.स.वासुदेव, कक्ष अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) श्रीम.ज्यो.मु.मोडकर, कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) श्री.दि.गो.फड, कक्ष अधिकारी, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) श्रीम.शोभा पत्की, का.अ, कृषि व पदुम विभाग
२२) श्री.र.ग.पांचाळ, कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३) श्रीम. शु.म. रोडगे, कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४) श्रीम.सुशिला धो.पवार, का.अ, च, सा,का.वि.
२५) श्री.बी.डी.झोंबाड, अधिक्षक, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक.
२६) श्री.र.रा.यादव, कक्ष अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
२७) श्रीम.रोहिणी पुरळवण, कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२८) श्रीम.अनिता लाड, कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२९) श्री.ए.के.देशमुख, वरिष्ठ अधिकारी,ए.प.आस.सीडी, उद्योग संचालनालय, मुंबई.
३०) श्री.व्ही.बी.रिंगणे, उद्योग उपसंचालक,
३१) श्री.गंगाधर महाजन गायकवाड, सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३२) सौ.वि.वि. पुजारी, रचना व कार्य अधिकारी, संचालनालय, मुंबई.

सदर बैठकीमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने विशाखा जजमेंटनुसार घालून देण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांची योग्य अंमलबजावणी सर्व विभागांकडून होण्याच्या अनुषंगाने खालील प्रमाणे निदेश देण्यात आलेले आहे.

| मुद्दा क्र | मुद्दा | संबंधित विभागाने करावयाची कार्यवाही | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | विशाखा जजमेंटमधील तरतुदींनुसार सर्व मंत्रालयीन विभागाने त्यांच्या विभागात (खुद्द) व त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांमध्ये समितीचे गठण झाली असल्याची खात्री करुन तसे प्रमाणपत्र देण्याबाबत. | सर्व विभाग | एक महिना |
| २. | महिला तक्रार निवारण समिती गठीत करताना त्यामध्ये- समितीच्या अध्यक्षा वरिष्ठ महिला अधिकारी असाव्यात. ५०% सदस्य महिला असाव्यात व याविषयाच्या अनुषंगाने कार्यरत असलेल्या अशासकीय संस्थेतील १ अशासकीय सदस्य असावा. अशा प्रकारे समिती गठीत करण्यात यावी. | सर्व विभाग | एक महिना |
| ३. | मंत्रालयीन सर्व विभागांसह सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालये, महामंडळे, कंपन्या, स्थानिक स्वराज्य संस्था, शासन अनुदानित मंडळे, संस्था इ. ठिकाणी महिला तक्रार निवारण समिती गठीत केल्याची सूचना दर्शनीय ठिकाणी (फलकावर) | सर्व प्रशासकीय विभाग | एक महिना |

| | | | |
|---|---|---|---|
| | लावावी. | | |
| ४. | कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाच्या अनुषंगाने आजपर्यंत प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या, सदर तक्रारींवर करण्यात आलेली कार्यवाही याबाबतची शासन परिपत्रक महिला व बाल विकास विभाग क्र.मकचौ-२००८/प्र.क्र४/मकक दि.३.१२.२००९ च्या सोबत विहित करण्यात आलेल्या विवरणपत्रामधील माहिती प्रशासकीय विभाग प्रमुखांनी त्यांच्या खुद्द विभागातील व त्यांच्य नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांची माहिती एकत्रित करुन ती या विभागास उपलब्ध करुन दयावी. | सर्व प्रशासकीय विभाग | एक महिना |
| ५. | कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाच्या अनुषंगाने आजपर्यंत प्राप्त झालेल्या तक्रारींवर शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग दि.५.१.२००४ व शासन परिपत्रक दि.४.१०.२०१० मधील तरतुदींनुसार विहित कालमर्यादेत कार्यवाही करावी. | सर्व प्रशासकीय विभाग | |

उपस्थितांचे आभार मानून सदरची बैठक समाप्त करण्यात आली.

*************